# गुरुकृपायोगानुसार साधना

मराठी (Marathi)

संकलक

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्घोष करणारे

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले

सद्गुरु डॉ. चारुदत्त प्रभाकर पिंगळे

सनातन संस्था

प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या ५,००० प्रती आणि या
लघुग्रंथाच्या आतापर्यंत २,१५,६०० प्रती प्रकाशित !

**प्रकाशक :** सनातन भारतीय संस्कृती संस्था,
सनातन आश्रम, खोली क्र. १०३, पोस्ट – 'ओएन्‌जीसी', देवद,
पनवेल, जि.रायगड (महाराष्ट्र). **दू.क्र. :** +९१(०२१४३)२३३१२०
**अन्य दू.क्र. :** +९१(०८३२) २३१२६६४
**ई-मेल :** granth@sanatan.org

**आवृत्ती पहिली** : मकरसंक्रांत, कलियुग वर्ष ५१०० (१४.१.१९९९)
**आवृत्ती नववी** : नागपंचमी, कलियुग वर्ष ५१२३ (१३.८.२०२१)
**तिसरे पुनर्मुद्रण** : वटपौर्णिमा, कलियुग वर्ष ५१२५ (३.६.२०२३)

प्रस्तुत लघुग्रंथ हिंदी, इंग्रजी आणि कन्नड या भाषांमध्ये उपलब्ध.

**मुद्रणस्थळ :** शकुंतला प्रिंटर्स, कोल्हापूर

**अर्पणमूल्य :** ₹ २०/– (₹ 20/-)

**ISBN** 978-93-89098-43-3

ॐ **ग्रंथ क्र. :** ३१

© **प्रकाशक** All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, mechanical, photocopying, recording or otherwise, without prior written permission of the original publisher. Violators will be liable for criminal / civil action.

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय

१. अध्यात्माच्या प्रसारासाठी ‘सनातन संस्थे’ची स्थापना !

२. ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाचे जनक !

३. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

४. ग्रंथ-निर्मिती : एप्रिल २०२३ पर्यंत ३६० ग्रंथांच्या १७ भाषांत ९३ लाख प्रती !

५. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

६. ‘सनातन प्रभात’ नियतकालिकांचे संस्थापक-संपादक !

७. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

(संपूर्ण परिचयासाठी वाचा – ‘**www.Sanatan.org**’.)

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !



स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।।

- जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

---

# परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

# लघुग्रंथाची अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


卐 **लघुग्रंथाचे मनोगत** ६

१. 'साधना' या शब्दाचा अर्थ ७

२. गुरु ७

३. गुरुकृपायोग (अर्थ आणि महत्त्व) ९

४. गुरुकृपायोगानुसार साधना १४

५. गुरुकृपायोगानुसार करावयाच्या साधनेचा सिद्धांत –'व्यक्ती तितक्या प्रकृती तितके साधनामार्ग' १४

६. गुरुकृपायोगानुसार करावयाच्या साधनेमागील प्रमुख तत्त्वे १६

७. साधनेत होणाऱ्या मूलभूत चुका ३४

८. गुरुकृपायोगानुसार साधनेचे प्रकार ३८

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ६१

# लघुग्रंथाचे मनोगत

जीवनातील दुःखांना धैर्याने सामोरे जाण्याचे बळ आणि सर्वोच्च प्रतीचा सतत टिकणारा आनंद केवळ साधनेनेच मिळतो. साधना म्हणजे ईश्वरप्राप्तीसाठी करावयाचे प्रयत्न. गुरूंच्या कृपेविना साधना करून ईश्वरप्राप्ती करून घेणे अतिशय कठीण असते. गुरुकृपेच्या माध्यमातून ईश्वरप्राप्तीच्या दिशेने वाटचाल होणे, याला 'गुरुकृपायोग' असे म्हणतात. गुरुप्राप्ती होण्यासाठी आणि गुरुकृपा सातत्याने होत रहाण्यासाठी करावयाची साधना म्हणजे 'गुरुकृपायोगानुसार साधना'.

गुरुकृपायोगानुसार साधनेची व्यष्टी साधना (वैयक्तिक उन्नतीसाठीचे प्रयत्न) अन् समष्टी साधना (समाजाच्या उन्नतीसाठीचे प्रयत्न) अशी दोन अंगे आहेत. या दोन्ही अंगांचे विविध पैलू आचरणात आणण्याविषयीचे मार्गदर्शन या लघुग्रंथात केले आहे. त्यानुसार साधना करून प्रत्येक जण गुरुकृपेस पात्र होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**